Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218/2403223
Syllabus : (0240) 2403209/2403120
Web Site : www.bamu.net.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

:: अभ्यासक्रम विभाग ::

संदर्भ क्रं. अभ्यासक्रम विभाग/२०१८ /7829-8265 दिनांक: १३-०३-२०१८
20

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नीत अध्यापक, विधी,
शारीरिक शिक्षण व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय: उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत
संदर्भ: क्रमांक-उशिसं /परित्रक /प्र.क्रं.०१-१७ /सीईटीसेल /१५०७० दिनांक २९ डिसेंबर, २०१७.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास मा. कुलसचिव यांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने उच्च शिक्षण अखत्यारितील व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत सोबत जोडलेल्या परिपत्रकातील केलेल्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. करीता, उपरोक्त प्रमाणे आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी.

(सोबत: शासनाचे परिपत्रकाची प्रत)

आपला विश्वासू

सहाय्यक कुलसचिव
अभ्यासक्रम विभाग

-=**=-

JK*/13032018/-

DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY
In. No. 21
(Gen. Admn.)
Date 12/01/18
AURANGABAD

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@gmail.com
फोन नं. ०२०/२६०५१७२९,२६१२२११९,२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१२२१२०

क्रमांक-उशिसं/परिपत्रक/प्र.क्र.०१-१७/सीईटीसेल/ १५७७० दिनांक : 29 DEC 2017

परिपत्रक

वाचा : -

१. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८,
२. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.-टिईएम-२०१५/सीआर-५३६/टिई-४, दिनांक ११.०३.२०१६,
३. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.-बीएड-४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दिनांक २१.०१.२०१६,
४. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.२४३/१५/मशि-२, दिनांक १२.०४.२०१६,
५. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.४४०/मशि-२, दिनांक २८.०१.२०१६,
६. शासन निर्णय क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र.३७९/मशि-२, दिनांक ०४.१२.२०१५.

विषय : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांबाबत . . .

१. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ अन्वये महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्याबाबत त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद केलेली आहे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २ च्या खंड (द) आणि कलम ३ ची पोटकलमे (१) व (२) अन्वये करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये [illegible] अभ्यासक्रम व संदर्भ क्र. ३ अन्वये शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित व अधिसूचित केलेले आहेत.

३. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून दिनांक ११.०३.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अधिसूचित केलेल्या अर्हता व [illegible] शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित [illegible] पदवी अभ्यासक्रम व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील विधी पदवी विभाग / अभ्यासक्रम यांच्या प्रवेशासाठी संदर्भ क्र. ४ च्या शासन आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या आहेत.

([illegible])

Acad.
D.A. Adv.
AR Syllabus
PL discuss
16/01/18

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Inward 320
Syllabus Section
19.01.18
Aurangabad

४. तसेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित / विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित अध्यापक व शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांच्या अनुक्रमांनूसार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठीची गुणवत्ता यादी तयार करुन त्यानूसार देण्याबाबत संदर्भ क्र. ५ अन्वये तरतूद केलेली आहे.

५. संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रम व संदर्भ क्र. ६ अन्वये विधी पदवी अभ्यासक्रमासाठीच्या सामायिक प्रवेश परीक्षेसाठी आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

६. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून संचालनायाच्या अखत्यारितील बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., विधी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांच्या अनुक्रमांनूसार केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेसाठीची गुणवत्ता यादी तयार करुन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे होत आहेत.

७. **उपरोक्त अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या या संचालनालय स्तरावर** गठीत तज्ज्ञ समितीमार्फत **तपासून प्रमाणित करुन देण्यात येतात. आपण सदरहू यादीमध्ये** नाव नमूद असलेल्या **विद्यार्थ्यांचेच प्रवेश हे संबंधित महाविद्यालयामध्ये ग्राह्य धरावेत. सदरहू यादीमध्ये** नाव नमूद नसलेल्या व महाराष्ट्र **विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करुन दिलेला** कोणताही प्रवेश **रद्दबातल ठरविण्यात यावा. उपरोक्त तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

२७/१२

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई.